दै. पुण्यनगरी दि. ०६/०९/२०२४

# नांदेडात जबरी चोरी करणारा जेरबंद; ३.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड :** शहरातील भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या जबरी चोरीच्या प्रकरणातील एका आरोपीस अटक करुन त्याच्याकडून पोलिसांनी सव्वा तीन लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अटक केलेल्या आरोपीचे नाव मुकेश गजानन कल्याणकर (वय २४, व्यवसाय मजुरी रा.देवीनगर, मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड) असे आहे.

'ऑपरेशन फ्लश ऑऊट' अंतर्गत सर्व ठाण्यांतर्गत गंभीर गुन्हे उघडकीस आणा असे आदेश जिल्हा पोलिस अधीक्षकांनी दिले आहेत. त्या अंतर्गत भाग्यनगर पोलिस ठाण्याने वरील कारवाई केली. दि. ४ सप्टेंबर रोजी भाग्यनगर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक विनोद देशमुख यांना जबरी चोरी करणाऱ्याबाबत माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे त्यांचे पथक शहरातील मालेगाव मार्गावर गस्तीवर होते. तेव्हा भाग्यनगर पोलिस ठाण्यात दाखल गुरनं.२९१/२४ कलम ३०९ (४),३ (५) बी.एन.एस हा गुन्हा केलेला आरोपी हा मालेगाव (ता. अर्धापुर जि. नांदेड)



येथील नांदेड स्पेशल आलू बिर्याणी या हॉटेलवर असल्याची खात्री पटली. नंतर या पथकाने तेथे जावून एका इसमास पकडले असता त्याने मुकेश गजानन कल्याणकर (वय २४, व्यवसाय मजुरी रा.देवीनगर, मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड) अशी ओळख सांगितली. त्याला ताब्यात घेऊन या पथकाने चौकशी केली असता त्याने गणेश दिलीप धबाले, राहुल जाधव व यश चितडवाड (रा.शिवनगर नांदेड) यांच्या सहकार्याने भाग्यनगर हद्दीत जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच या पथकाने त्याच्याकडून गुरनं २९१/२४ गुन्ह्यातील जबरी चोरीतील २ सोन्याचे गंठन, पोलीस ठाणे भाग्यनगर, नांदेड गु.र.नं.२३९/२४ कलम ३९२,३४ भा.दं. वि. मधील १ असे ३ सोन्याचे गंठण ४४ ग्रॅम वजनाचे जप्त केले. हा मुद्देमाल ३ लाख २१ हजार ५२७ रुपयांचा आहे. शंभर टक्के मुद्देमाल जप्त करण्यात या पथकाला यश आले.

ही कारवाई पोलिस अधीक्षक अविनाश कुमार, अपर अधीक्षक सुरज गुरव, खंडेराव धरणे, शहर उपविभागीय पोलिस अधिकारी कार्तिका यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक रामदास शेंडगे, गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक विनोद देशमुख, पोहेकॉ गजानन किडे, पोहेकॉ प्रदीप गर्दनमारे, ओमप्रकाश कवडे, सूर्यभान हासे, नवनाथ गुट्टे यांनी पार पाडली.